# नौपाडा पोलीस ठाणे, ठाणे शहर

प्रशांतनगर, एम.जी.रोड, विष्णुनगर, ठाणे(प.) -४००६०२

संपर्क :०२२२५४२३३००

ई–मेल:cp.thane.naupada@mahapolice.gov.in

वेबसाईट:–www.thanepolice.gov.in


## परराज्यातून हत्याराची तस्करी करणा-या गुन्हेगारास अटक करण्यात नौपाडा पोलीसांना यश जिवंत काडतुसासह अग्निशस्त्र जप्त

दिनांक १३/१२/२०२५ रोजी नौपाडा पोलीस स्टेशनचे सपोनि/मंगेश भांगे यांना गुप्त बातमीदारामार्फत बातमी प्राप्त झाली की, भोपाळ, मध्यप्रदेश या ठिकाणाहून एक इसम अग्निशस्त्र घेवुन सर्व्हीस रोड, नौपाडा जि.ठाणे या ठिकाणी विक्री करण्याकरीता येणार आहे अशी खात्रीशीर माहीती प्राप्त झाल्याने सपोनि मंगेश भांगे व तपास तथकातील स्टाफ यांनी नौपाडा सर्व्हिस रोड ओपन जिमच्या जवळ सापळा रचुन थांबलेले असताना मिळालेल्या बातमी प्रमाणे एक इसम सदर ठिकाणी संशयित उभा असलेला दिसला त्याच्या पाठीवर एक बॅग होती. सपोनि भांगे यांनी सदर इसम याची खात्री झाली असता त्यास ताब्यात घेण्याकरीता हालचाल केली असता तो पोलीसांची चाहुल लागताच सदर ठिकाणाहून पळून जावू लागल्याने त्याचा पाठलाग करून त्यास ओम शांकुतल सोसायटीचे समोर, सर्व्हीस रोड, नौपाडा जि.ठाणे या ठिकाणी नौपाडा तपास पथकाचे मदतीने ताब्यात घेण्यात आले. त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव **कुणाल गोपाल यादव,वय १९ वर्षे,रा. गाव दुलादेव छिंदवाडा,तहसील अमरवाडा,राज्य भोपाळ, मध्यप्रदेश** असे सांगितले त्यास सदर ठिकाणी येण्याचे कारण विचारले असता तो उडवाउडवीची उत्तरे देवु लागल्याने त्याचे पाठीवर असलेल्या बॅगची तपासणी केली असता व त्याची अंगझडती घेतली असता त्याचे बॅग मध्ये **एक ५०,०००/-रू. किं.चा सिल्वर बॉडी असलेला देशी बनावटीचा लोखंडी पिस्टल, व एक जिवंत काडतूस** असा मुददेमाल मिळून आला असून त्याचेकडे केलेल्या तपासामध्ये त्याने सदर देशी बनावटीचा लोखंडी पिस्टल व एक जिवंत काडतूस असे भोपाळ, मध्यप्रदेश येथून विक्री करण्याकरीता घेवून आला असल्याचे सांगितले. सदर इसमास पुढील कार्यवाहीकरीता ताब्यात घेवून त्याचेविरुदध नौपाडा पोलीस ठाणे येथे गु.रजि.नं. ७४२/२०२५ महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) ,१३५ सह भारतीय हत्यार कायदा १९५९ चे कलम ३, २५ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला असून त्यास मा. न्यायालयात हजर केले असता मा. न्यायालयाने दि. १६/१२/२०२५ रोजी पावेतो पोलीस कस्टडी दिली असून आरोपीकडे गुन्हयाचे अनुषंगाने अधिक तपास चालू आहे.

सदर कामगिरी हि मा. पोलीस उप आयुक्त,परि.१ श्री.सुभाष बुरसे, मा.सहा.पोलीस आयुक्त संभाजी जाधव, नौपाडा विभाग, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.अभय महाजन, पोनि(गुन्हे) श्री.संजय दवणे,पोनि लक्ष्मण राठोड (प्रशासन) यांचे मार्गदर्शनाखाली तपासी अधिकारी मंगेश भांगे, सहायक पोलीस निरीक्षक, पोहवा/राजेंद्र गायकवाड, पोहवा/विलास देसाई, पोहवा/ईश्वर गोलवड, पोहवा/मेहरबान तडवी, पोना/ सुनिल धोंडे, पोशि/सारंग कांगणे, पोशि/गंगाधर तिर्थकर, पोशि/प्रमोद शिंदे,पोशि करण पाटील,उदय वडार ,सचिन रांजणे, मपोशि विदया घुले यांनी केलेली आहे.